# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,
# ४१२ ई, शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६

☏ २५६५६२३४ फॅक्स (०२०) २५६५६२३४


जा.क्र.तंशिविकापु/विवि/प्रो.प्रा./२००९-१०/ १०३०८ दिनांक :-१६-१२-२००८

प्रति,

प्राचार्य,
शासकीय /शासकीय अनुदानित/विनाअनुदानित अभियांत्रिकी /औषधनिर्माधशास्त्र /हॉटेल मॅनेजमेंट ॲन्ड केटरींग टेक्नॉलॉजी व तत्सम पदविका संस्था

विषय :- शैक्षणिक वर्ष २००९-१० पासून मुदतवाढ मिळण्याबाबत पदविका संस्थांकडून प्रोग्रेस प्रोफाईल (कम्प्लायन्स रिपोर्ट अलॉंगविथ मॅडेंटरी डिस्क्लोजर) मागवून घेण्याबाबत.

संदर्भ :- मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. १०/एनजीपी/पदविका/मुदतवाढ/२००८/८५४ दि.१०/१२/२००८

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यांत येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषदेने पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांना शैक्षणिक वर्ष २००८-०९ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. सदर संस्थांना शैक्षणिक वर्ष २००९-१० मध्ये मुदतवाढ मिळण्यासाठी कम्प्लायन्स रिपोर्ट अलॉंगविथ मॅडेंटरी डिस्क्लोजर मागविण्यांत येत आहे. त्यासाठी या विभागीय कार्यालयाअंतर्गत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषदेने मान्यता दिलेल्या पदविका अभ्यासक्रमांच्या शासकीय , अशासकीय अनुदानित, तसेच विना अनुदानित पदविका (तंत्रनिकेतन, औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट ॲन्ड केटरींग टेक्नॉलॉजी, वास्तुशास्त्र व तत्सम) संस्थांनी कम्प्लायन्स रिपोर्ट अलॉंगविथ मॅडेंटरी डिस्क्लोजर भरुन या विभागीय कार्यालयास दिनांक ३१/१२/२००८ पर्यंत सादर करावेत. कम्प्लायन्स रिपोर्ट अलॉंगविथ मॅडेटरी डिस्क्लोजरचा नमुना संचालनालयाच्या संकेत स्थळावर (www.dte.org.in/download)उपलब्ध आहे.. कम्प्लायन्स रिपोर्ट अलॉंगविथ मॅडेंटरी डिस्क्लोजर सादर करताना खालील बाबी विचारात घेण्यात याव्यात व त्याचे काटेकोरपणे पालन करण्यांत यावे.

१ ज्या संस्थांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषदेने २००८-०९ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. अशा सर्व संस्थ ांनी शैक्षणिक वर्ष २००९- १० साठी मुदतवाढ मिळणेबाबत कम्प्लायन्स रिपोर्ट अलॉंगविथ मॅडेंटरी डिस्क्लोजर सादर करावेत.

२. शैक्षणिक वर्ष २००८-०९ पासून पदविका अभ्यासक्रमांच्या काही नवीन संस्थांना मान्यता मिळालेली आहे. अशा संस्थांनी कम्प्लायन्स रिपोर्ट अलॉंगविथ मॅडेंटरी डिस्क्लोजर सादर करावेत.

३. या विभागीय कार्यालयाअंतर्गत येणा-या सर्व पदविका संस्थांनी त्यांच्या संस्थेत चालविण्यात येणा-या अभ्यासक्रमांची माहिती व संस्थेबाबतची इतर माहिती संचालनालयाच्या संकेत स्थळावर अद्ययावत करण्यांत यावी व त्याची एक प्रत मॅडेटरी डिस्कोजर सोबत जोडण्यांत यावी.

४. संस्थांना शैक्षणिक वर्ष २००८-०९ साठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषदेने दिलेल्या मुदतवाढीच्या आदेशामध्ये ज्या अभ्यासक्रमांचा समावेश करण्यांत आलेला आहे. त्याच अभ्यासक्रमांचा त्याच प्रवेश क्षमतेसह समावेश कम्प्लायन्स रिपोर्ट अलाँगविथ मॅडेंटरी डिस्क्लोजरमध्ये करण्यात यावा.

५. कम्प्लायन्स रिपोर्ट अलाँगविथ मॅडेंटरी डिस्क्लोजर मध्ये फक्त अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषदेच्या अखत्यारीतील पदविका अभ्यासक्रमांचाच समावेश करण्यांत यावा.

६. ज्या संस्था शैक्षणिक वर्ष २००९-१० साठी आपल्या संस्थेत टयूशन फी वेवर स्कीम राबविणार आहेत. अशा संस्थांनी त्यासाठी स्वतंत्रपणे प्रस्ताव सादर करावेत. तसेच ज्या संस्थांना शैक्षणिक वर्ष २००८-०९ मध्ये अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषदेने टयूशन फी वेवर स्कीम राबविण्यांस परवानगी दिलेली आहे. त्या संस्थांनीही त्यासाठी स्वतंत्रपणे प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.

७. शैक्षणिक वर्ष २००८-०९ पासून ज्या संस्थांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषदेने सेकंड शिप्ट सुरु करण्यांस परवानगी दिलेली आहे. अशा संस्थांमधील अभ्यासक्रमांचा समावेश २००९-१० साठीच्या कम्प्लायन्स रिपोर्ट अलाँगविथ मॅंडेटरी डिस्क्लोजर मध्ये करण्याबाबत सूचीत करण्यांत येत आहे.

८. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयाने शैक्षणिक वर्ष २००८-०९ करीता ज्या पदविका अभियांत्रिकी /औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या संस्थांना शो कॉज नोटीस दिल्या होत्या त्या शो कॉज मधील त्रुटींची पूर्तता डिसेंबर २००८ पूर्वी करण्याबाबत ही सूचना देण्यांत आल्या होत्या त्याअनुषंगाने संस्थेने पूर्तता अहवाल सोबतच्या कम्पायन्स ॲन्ड मॅडेंटरी डिस्क्लोजर बरोबर स्वतंत्रपणे सादर करण्यांत यावा.

**मुदतवाढीचा प्रस्ताव सादर करतांना सर्व विनाअनुदानित पदविका संस्थांनी तपासणी शुल्काचा धनाकर्ष मा. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांचे नांवे रु.१५०००/- चा धनाकर्ष काढण्यांत यावा . तसेच प्रस्ताव दोन प्रतीत या कार्यालयास विहीत मुदतीत पाठविण्यांत यावा. विहीत मुदतीनंतर कोणत्याही संस्थेंचा प्रस्ताव स्विकारण्यांत येणार नाही. याची कृपया दखल घेण्यांत यावी.**

(प्रा. गो. पं. चौधरी)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
पुणे १६